प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत - राज्य व्यवस्थापित-PMKVY २.० - CSSM-) या योजनेंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.. (रु.१६.९४ कोटी)

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/ कौशल्य-१ (अभियान-१),**
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१ जून,२०२१

**वाचा :**

१) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक १५/०७/२०१५.

२) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २०/०५/२०१६.

३) केंद्र शासनाच्य कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने विशेष प्रकल्प (Special Project) व केंद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) संदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना दिनांक २५/०१/२०१७.

४) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २८/०२/२०१७.

५) उप संचालक, SNP Division/Wing II, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक बी-१२०१२/३७/२०१७-एसएनपी, दिनांक २५/०९/२०१७.

६) प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-१ महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्रमांक खं.वि./चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओआर-८८/२०१७-१८/७५०, दिनांक २२/११/२०१७

७) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.

८) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक २७/०३/२०१८.

९) संचालक, एमएसडीई/भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक F.No. B-१२०११/०१/२०१६ -SDE, Part II/दिनांक ०१/०४/२०२०.

१०) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक १२/११/२०२०.

११) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक १४/०१/२०२१

१२) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक २३/०३/२०२१.

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने "प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना" (१०० टक्के केंद्र पुरस्कृत, राज्य व्यवस्थापित-PMKVY २.० - CSSM) या योजनेचा दुसरा टप्पा राज्यात राबविण्यास सं.क्र.८ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० करीता एकूण १ कोटी युवकांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. केंद्र शासनामार्फत सदर योजनेमध्ये राज्य शासनाचा सहभाग वाढविण्याच्यादृष्टीने सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत.

२. या योजनेचा दुसरा टप्पा सन २०१६-१८ ते २०१९-२० या कालावधीकरीता निश्चित करण्यात आला होता. सन २०२० मध्ये सदर योजनेचा कालावधी संपुष्टात आला होता तथापि, केंद्र शासनाने सदंर्भाधीन क्र. ९ येथील पत्रान्वये सदर योजना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात चालू ठेवण्यास व राबविण्यास मान्यता दिली आहे.

३. "प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००%केंद्र पुरस्कृत योजना)" या कार्यक्रमांतर्गत राज्यांच्या विशेष प्रकल्पांसाठी (Special Project) व केद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता केंद्राकडून Public Financial Management System (PFMS) या प्रणालीमार्फत, सन २०१७-१८ करीता रुपये ८५,७७,६२,६१५/- इतका निधी राज्य शासनास प्राप्त असून, सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला आहे. त्यापैकी रु. ६८.८३ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. आता वित्त विभागाच्या मान्यतेस अनुसरुन या योजनेंतर्गत रु. १६.९४ कोटी इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना अर्थसकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब नस्तीवर विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००%केंद्र पुरस्कृत योजना)" या योजनेंतर्गत वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन रु.१६.९४ कोटी इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना खालील अटींच्या अधीन राहून अर्थसकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत योजनेंकरिता उपलब्ध होणारा निधी मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजना, ०२ सेवायोजना सेवा,००१ संचालन व प्रशासन, (०१) सेवायोजन संचालनालय, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (१) (१२) प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००%केंद्र पुरस्कृत योजना) २२३०A३०७, ३१ -सहायक अनुदाने या लेखाशीर्षाखालील सन २०२०-२१ मधील उपलब्ध अनुदानातून तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०९.२०१७ रोजीच्या पत्रामधील मार्गदर्शक सुचनेस "कार्यान्वयिन यंत्रणेने"खर्च करावा.

३. राज्य शासनाने या योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. राज्यात कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी घोषित करण्यात आलेली "नोडल एजन्सी" महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था या योजनेमधील अंर्तभूत प्रकल्पांसाठी कार्यान्वयिन यंत्रणा राहील.

५. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार तसेच विहित केलेल्या कालावधीमध्ये या योजनेंतर्गत उपक्रमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता कोणत्याही नव्याने पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येवू नये, उपलब्ध पायाभूत/प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करून प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात याव्यात.

६. देश पातळीवर कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने संदर्भाधिन अधिसूचनेद्वारे सामायिक मार्गदर्शन सूचना निर्गमित केलेल्या आहेत. कार्यान्वयन यंत्रणेने सामायिक मार्गदर्शन सुचानांमधील तरतुदींनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या तरतुदीनुसार तसेच ज्या उपक्रम/प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे त्याच उपक्रम/प्रकल्पासाठी खर्च करणे बंधनकारक राहील तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास विहित कालमर्यादेत पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहील.

७. याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवून खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तपशील केंद्र शासनाच्या संबधीत मंत्रालयाकडे तसेच शासनाकडे पाठविण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी घ्यावी. तसेच सदर लेखे महालेखापाल यांना लेखा तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

८. सदर निधी खर्च करताना वित्तीय अधिकार नियमांचे तसेच वित्त व नियोजन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/नियम/अटी/शर्ती यांचे पालन करण्यात यावे.

९. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३५/ व्यय-६, दिनांक १०जून, २०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१० सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१०६२११६०५२७७९०३ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Dr Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, cn=Dr Suvarna Siddharth Kharat
Date: 2021.06.21 16:12:10 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
**सह सचिव, महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१०. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
११. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१२. महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर.
१३. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय मुंबई.
१४. निवड नस्ती (कौशल्य-१).